**वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना सध्याच्या पदावरील १२ वर्षाची नियमित सेवा केल्यानंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणीचा लाभ सुधारीत करणेबाबत..**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/३७४००७०/९९८/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे**

**वाचा**:- १. वित्त विभाग यांचेकडील निर्णय क्र. वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ दिनांक ०१/०४/२०१०
२. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.साप्रवि/गोप-अभि/२२/२०१२ दिनांक २४/०१/२०२३
३. गठीत निवड समितीचे मंजूर इतिवृत्त दिनांक १६/१०/२०२६

संदर्भ क्रमांक २ च्या आदेशान्वये खालील नमुद कर्मचारी यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतन संरचना अनुज्ञेय असल्याने पदोन्नती साखळीतील वरीष्ठ पदाची वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८००/- अधिक ग्रेड वेतन ४२००/- लागु करणेत आलेली होती. तरी सदर कर्मचारी हे सदर कालावधीत दिनांक १६/०२/२००९ ते दिनांक ३१/०८/२००९ अखेर २०७ दिवस सेवा निलंबित होते. सदरचा सेवा निलंबन कालावधी हा कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरणेत आलेला असलेने संदर्भ क्रमांक २ च्या आदेशातील मंजुर लाभ पुढील प्रमाणे सुधारीत करणेत येत आहे.

| अ क्र. | वरिष्ठ सहाय्यकाचे नाव | वरिष्ठ सहाय्यक पदावरील हजर दिनांक | कार्यालयीन अधिक्षक पदोन्नती साखळीतील वेतनश्रेणी ज्या तारखेपासुन दिली आहे ती तारीख | लाभ सुधारीत करणेत आलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री जयप्रकाश पेत्रस गायकवाड | १२/१०/१९९९ | १५/०६/२०१२ | ०४/११/२०१२ |

संदर्भ क्रमांक २ च्या आदेशातील अटी व शर्ती जशास तशा लागु राहतील. सदर आदेशाची नोंद कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी. तसेच सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र .....20261104040203..... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 16:13:11

**(आनंद भंडारी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

**श्री जयप्रकाश पेत्रस गायकवाड, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव**
**द्वारा व प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव**

**प्रत :- महितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

१. संबंधित कार्यालय प्रमुख.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. निवड नस्ती